**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट दिनांक - २७/०८/२०२३**

## पिंपरी चिंचवड आयुक्तालयात संघटित गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राक्षे टोळी, शिंदे टोळी, कांबळे टोळी या ०३ टोळयांवर " मोका पॅटर्न "

**मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री. विनय कुमार चौबे यांनी कार्यभार घेतल्यानंतर** गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२३ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील २७ संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण २३९ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**१) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नं. ५८०/२०२३, भादंवि. ३९७, ३९४, ४२७, ५०४, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ४ (२५), म.पो.का.कलम ३७(१) सह १३५, क्रि.लॉ.अ.ॲक्ट कलम ३ व ७** चे तपासामध्ये आरोपी नामे, **(१) सुदर्शन ऊर्फ पिल्या संभाजी राक्षे, (टोळी प्रमुख)** वय २७ वर्षे, रा.शास्त्री चौक, भोसरी पुणे (२) **करण गुरुनाथ राठोड**, वय २१ वर्षे, रा.रोडे हॉस्पीटल शेजारी, दिघी रोड, भोसरी पुणे. **(३) प्रथमेश ऊर्फ पत्या दिलीप कांबळे,** वय २० वर्षे, रा. शास्त्री चौक, भोसरी पुणे. **(४) विरेंद्र ऊर्फ विन्या विश्वनाथ चव्हाण,** वय १९ वर्षे रा. राजा सोयायटी, शास्त्री चौक, भोसरी पुणे. यांचेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर **एकुण १६ गुन्हे** दाखल असुन **१२ गंभीर गुन्हे** केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.

२) **पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ७०२/२०२३ भा.दं.वि. कलम ३९२, ३२३, ५०४, ५०६, ४२७, ३४, महा.पो.का. ३७(१) सह १३५** चे तपासामध्ये आरोपी नामे १) **अतुल काळूराम शिंदे**, **(टोळी प्रमुख)** वय २२, रा.बौध्द विहार शेजारी, गांधीनगर पिंपरी पुणे **(२) रोहन माणिक जाधव,** वय १९ वर्षे, रा. बनसाळ गल्ली च्या बाजूला गांधीनगर, पिंपरी पुणे**(३) किरण मंगेश बिरादार**, वय २१ वर्षे, रा. दत्त मंदीरामागे, मोहननगर, चिंचवड पुणे **(४) पवन ससाणे** रा. गांधीनगर, पिंपरी पुणे **(पाहिजे आरोपी)** यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर **टोळी प्रमुख** व त्याचे साथीदार यांच्यावर **एकुण ०७ गंभीर गुन्हे केल्याची** नोंद आढळुन आलेले आहेत.

**३) पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ७२९/२०२३ भा.द.वि. कलम ३९५, ४२७ या १) अंगद बळीराम कांबळे, (टोळी प्रमुख)** वय ३८ वर्षे, रा. राजीव गांधी वसाहत, वसंतदादा पाटील शाळेचे मागे, नेहरुनगर, पिंपरी पुणे **२) आकाश शंकर लष्करे**, वय २५ वर्षे, रा. विटकर चाळ, साईबाबा मंदीराशेजारी, नेहरुनगर पिंपरी **३) शाहरुख नईम शेख**, २६ वर्षे, रा.वसंतदादा पाटील शाळेचे समोर, भोसलेनगर, नेहरुनगर पपरी पुणे **(४) दिनेश गोरख माने**, वय २९ वर्षे रा. विटकर चाळ, साईबाबा मंदीराशेजारी, नेहरुनगर पिंपरी पुणे यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर **टोळी प्रमुख** व त्याचे साथीदार यांच्यावर **एकुण १० गंभीर गुन्हे केल्याची** नोंद आढळुन आलेले आहे.

वरील **तीनही टोळी प्रमुख यांनी त्यांचे साथीदारांसह** अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी **भोसरी, पिंपरी, देहुरोड, दिघी वाकड, एमआयडीसी भोसरी** पोलीस स्टेशन हद्दीत **खून, खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, जबरी चोरी, दुखापत करुन जबरी चोरी करणे, पुरावा नष्ट करणे, दुखापत करणे, दरोडयाची तयारी करणे, घरात घुसुन मारहाण करणे, खंडणी मागणे, कट रचणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, छळवणुक करणे, गैरकायद्याची मंडळी जमविणे, बेकायदेशीररित्या घातक शस्त्रे जवळ बाळगणे गाडयांची, सामानाची तोडफोड व जाळपोळ करुन नुकसान करणे, असे आपल्या टोळी सदस्यांकडुन गुन्हे घडवुन आणणे व दहशत निर्माण करणे, दहशत माजवुन नागरिकांना वेठीस धरणे, पोलीसांनी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी काढलेल्या आदेशांचा भंग करणे,** अशा प्रकारेचे गंभीर स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमाणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवून टोळी प्रमुखांनी गुन्हे केलेले आहेत.

सदर **राक्षे टोळी, शिंदे टोळी व कांबळे टोळी या तीनही संघटीत टोळीतील** साथीदार यांनी आपल्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व रहावे व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे बेकायदेशिरपणे आर्थिक फायदयाकरीता सदरचे गुन्हे केल्याचे दिसुन आल्याने, तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा. पोलीस सह आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे मॅडम, मा. पोलीस उप-आयुक्त (परि-०१) श्री. विवेक पाटील, मा.सपोआ श्री. सतिश कसबे (पिंपरी विभाग), मा.सपोआ श्री. बाळासाहेब कोपनर (गुन्हे-१), यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पी.सी.बी (गुन्हे शाखा), वपोनि भास्कर जाधव, (भोसरी पो.स्टे), वपोनि श्री. राम राजमाने (पिंपरी पो.स्टे), पोउपनि सुहास खाडे (भोसरी पो.स्टे) तसेच अंमलदार पो.हवा सचिन चव्हाण, पो.हवा. व्यंकप्पा कारभारी, (पी.सी.बी. गुन्हे शाखा), पोउपनि सुहास खाडे, पोहवा राजेंद्र राठोड, पोशि वसंत दळवी (भोसरी पो. स्टे.), सपोफौ अनिल गायकवाड, मपोना माया कोल्हे, पो.शि. दत्ताजी कौठेकर (पिंपरी पो.स्टे.) यांचे पथकाने केली आहे.

## १) टोळी प्रमुख व सदस्यांवर दाखल असलेले वैयक्तीक गुन्हे

**(१) सुदर्शन ऊर्फ पिल्या संभाजी राक्षे**, **(टोळी प्रमुख)** रा.शास्त्री चौक, भोसरी पुणे (**भोसरी पो.स्टे)**

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | भोसरी | ५८०/२०२३ | भादंवि. ३९७,३९४,४२७,५०४,५०६,३४. |
| २ | भोसरी | ५७८/२०२३ | भादंवि. ३८५,३९२,४२७,५०६,३४, |
| ३ | भोसरी | ८१४/२०२२ | भादंवि. ३८४,५०४,३४ |
| ४ | भोसरी | ६४१/२०२१ | भादंवि. ३९२, आर्म अॅक्ट ३(२५). |
| ५ | भोसरी | १७४/२०१८ | आर्म अॅक्ट ४(२५),म.पो.का.३७(१)१३५. |
| ६ | भोसरी | २३०/२०१७ | भादंवि. ३२५,४९८(अ) |
| ७ | भोसरी | ३९१/२०१७ | भादंवि.३२६,१४३,१४७,१४९,आर्म अॅक्ट ३(२५) |
| ८ | वाकड | १८०/२०१६ | भादंवि. ३०२, १२०ब, १४३,१४७,१४९ |
| ९ | भोसरी | २६३/२०१५ | भादंवि. ३२६,३४१,३४ |

**(२) करण गुरुनाथ राठोड,** वय २१ वर्षे, रा.रोडे हॉस्पीटल शेजारी, दिघी रोड, भोसरी पुणे.

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १. | भोसरी | ५८०/२०२३ | भादंवि. ३९७,३९४,४२७,५०४,५०६,३४ |
| २. | भोसरी | ५७८/२०२३ | भादंवि. ३८५,३९२,४२७,५०६,३४, |
| ३. | भोसरी | ९५६/२०२२ | भादंवि. ३०७,३२६,३२४,१४३,१४७,१४८,१४९ |
| ४. | भोसरी | ४६४/२०२० | भादंवि. ३९२,३४ |
| ५. | भोसरी | ४३२/२०२० | भादंवि. ३८०,३४ |
| ६. | भोसरी | ४८३/२०२० | भादंवि. ३७९,३४ |
| ७. | दिघी | ३५३/२०२० | भादंवि. ३९९,४०२ |

**(३) प्रथमेश ऊर्फ पत्या दिलीप कांबळे,** वय २० वर्षे, रा. शास्त्री चौक, भोसरी पुणे.

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १. | भोसरी | ५८०/२०२३ | भादंवि. ३९७,३९४,४२७,५०४,५०६,३४ |
| २. | भोसरी | ५७८/२०२३ | भादंवि. ३८५,३९२,४२७,५०६,३४ |

**(४) विरेंद्र ऊर्फ विन्या विश्वनाथ चव्हाण,** वय १९, रा. राजा सोयायटी,शास्त्री चौक, भोसरी

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | भोसरी | ५८०/२०२३ | भादंवि. ३९७,३९४,४२७,५०४,५०६,३४ |
| २ | भोसरी | ३०९/२०२३ | भादंवि. ३९२,३२३,५०४,४२७,३४, |
| ३. | भोसरी | ९५६/२०२२ | भादंवि.३०७,३२६,३२४,१४३,१४७,१४८,१४९ |
| ४. | भोसरी | ६१७/२०२२ | भादंवि. ३२४,५०४,५०६. |

**२) टोळी प्रमुख व सदस्यांवर दाखल असलेले वैयक्तीक गुन्हे**

**(१) अतुल काळूराम शिंदे, (टोळी प्रमुख)** वय २२, रा. गांधीनगर पिंपरी पुणे **( पिंपरी पो.स्टे)**

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७०२/२०२३ | भादंवि. ३९२,३२३,५०४,५०६,४२७ |
| २ | पिंपरी | २८८/२०२३ | भादंवि. ३९२,३४ |
| ३ | भोसरी | ६२६/२०२० | भादंवि. ३९५ |
| ४ | पिंपरी | ३८९/२०२० | भादंवि.३९२,३४ |
| ५ | एम.भोसरी | २९७/२०२० | भादंवि. ३९५, आर्म ॲक्ट ४(२५) |
| ६ | पिंपरी | २३५/२०१८ | भादंवि. ३९५,४२७, आर्म ॲक्ट ४(२५) |

**(२) रोहन माणिक जाधव,** वय १९ रा. बनसाळ गल्ली च्या बाजूला गांधीनगर, पिंपरी

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७०२/२०२३ | भादंवि. ३९२,३२३,५०४,५०६,४२७ |
| २ | पिंपरी | ३८९/२०२० | भादंवि.३९२,३४ |

**३) किरण मंगेश बिरादार,** वय २१ वर्षे, रा. दत्त मंदीरामागे, मोहननगर, चिंचवड पुणे

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७०२/२०२३ | भादंवि. ३९२,३२३,५०४,५०६,४२७ |
| २ | पिंपरी | २८८/२०२३ | भादंवि. ३९२,३४ |
| ३ | पिंपरी | ५७०/२०२२ | भादंवि. ५०६(२),५०४,३४ आर्म ॲक्ट ४(२५) |
| ४ | पिंपरी | ३८९/२०२० | भादंवि.३९२,३४ |
| ५ | एम.भोसरी | २९७/२०२० | भादंवि. ३९५, आर्म ॲक्ट ४(२५) |

**(४) पवन ससाणे** रा. गांधीनगर, पिंपरी पुणे

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७०२/२०२३ | भादंवि. ३९२,३२३,५०४,५०६,४२७ |
| २ | पिंपरी | २८८/२०२३ | भादंवि. ३९२,३४ |

**३) टोळी प्रमुख व सदस्यांवर दाखल असलेले वैयक्तीक गुन्हे**

**१) अंगद बळीराम कांबळे, (टोळी प्रमुख)** वय ३८ वर्षे, रा. नेहरुनगर, पिंपरी पुणे **(पिंपरी पो.स्टे)**

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७२९/२०२३ | भादंवि. ३९५,४२७ |
| २ | पिंपरी | ३८५/२०२० | भादंवि. ३९२,३२३,५०४,५०६ |
| ३ | पिंपरी | ७३९/२०१९ | भादंवि. ५०६(२), आर्म ॲक्ट ४(२५) |
| ४ | देहुरोड | १७१/२०१६ | भादंवि. ३०२,३४ |
| ५ | पिंपरी | ६८३/२०१५ | भादंवि.३२६,४५२,५०४,४२७,आर्म ॲक्ट ४(२५) |
| ६ | पिंपरी | ६६६/२०१५ | भादंवि. ३९४,३४ |
| ७ | पिंपरी | ३०२/२०१५ | भादंवि. ३२५,३२४,३२३,५०४,३४ |
| ८ | पिंपरी | १५९/२०१३ | भादंवि. ३२५ |

**२) आकाश शंकर लष्करे,** वय २५ रा.विटकर चाळ, साईबाबा मंदीराशेजारी,नेहरुनगर पिंपरी

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७२९/२०२३ | भादंवि. ३९५,४२७ |
| २ | पिंपरी | ३११/२०१५ | भादंवि. ३०७,रॉयट, मोका का.क.३(१)(ii), ३(४) |
| ३ | पिंपरी | २१०/२०१५ | भादंवि. ३२४,३२३,५०४,५०६,रॉयट |

**३) शाहरुख नईम शेख,** रा. वसंतदादा पाटील शाळेचे समोर,भोसलेनगर,नेहरुनगर, पिंपरी

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७२९/२०२३ | भादंवि. ३९५,४२७ |

**(४) दिनेश गोरख माने,** वय २९ रा. विटकर चाळ, साईबाबा मंदीराशेजारी, नेहरुनगर पिंपरी

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ७२९/२०२३ | भादंवि. ३९५,४२७ |
| २ | पिंपरी | ३११/२०१५ | भादंवि.३०७,रॉयट, मोका का.क.३(१)(ii), ३(४) |
| ३ | पिंपरी | २१०/२०१५ | भादंवि. ३२४,३२३,५०४,५०६,रॉयट |

**(सतिश माने)**
जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड आयुक्तालय